**पंचायत समितीची मासिक सर्वसाधारण सभा शुक्रवार दिनांक १४/०८/२०२६ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता पंचायत समिती कार्यालय श्रीवर्धन महाराष्ट्र भूषण आदरणीय तीर्थ.डॉ.श्री.नानासाहेब धर्माधिकारी सभागृह येथे घेणेंत आली. त्या सभेचे इतिवृत्त भाग-१ व २**

जा.क्र.पंसश्री/प्रशासन/वशी/१/ /२०२६
पंचायत समिती कार्यालय, श्रीवर्धन
दिनांक ०१/०९/२०२६

प्रति,

मा.श्री/श्रीमती.........................................................................................
पंचायत समिती सभापती/उपसभापती/सदस्या/सदस्य
मु.पो...............................................तालुका श्रीवर्धन, जि.रायगड

प्रत- माहितीसाठी सविनय सादर.

१. मा. खासदार श्री. सुनिलजी तटकरे साहेब, गीताबाग मु.सुतारवाडी पो.जामगांव, ता.रोहा, जि.रायगड
२. मा. आमदार कु.अदिती सुनिल तटकरे मॅडम,गीताबाग मु.सुतारवाडी पो.जामगांव, ता.रोहा,जि.रायगड
३ मा. अध्यक्ष सो. रायगड जिल्हा परिषद अलिबाग.
४. मा. उपाध्यक्ष सो. रायगड जिल्हा परिषद अलिबाग.
५. मा. सभापती सो...............................................समिती रायगड जिल्हा परिषद अलिबाग
६. मा. विरोधी पक्षनेता रायगड जिल्हा परिषद अलिबाग.
७. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी रायगड जिल्हा परिषद अलिबाग.
८. मा. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी रायगड जिल्हा परिषद अलिबाग.
९. मा. खाते प्रमुख (सर्व)................................................................रा.जि.प. अलिबाग.

प्रत:- माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी.

--------------------------------------------------------------------------------
--------------------------------------------------------------------------------
--------------------------------------------------------------------------------

प्रत :- पंचायत समितीमधील सर्व शाखा प्रमुख, शाखा / कनिष्ठ अभियंता (बांधकाम /एस्.एस्.ए.)
सहाय्यक / कनिष्ठ लेखाधिकारी, कृषि अधिकारी (जनरल /वि.घ.यो.)
विस्तार अधिकारी (सर्व)......................................पंचायत समिती श्रीवर्धन.

सचिव तथा गट विकास अधिकारी (वर्ग - १)
पंचायत समिती श्रीवर्धन

**पंचायत समितीची मासिक सर्वसाधारण सभा शुक्रवार दिनांक १४/०८/२०२६ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता पंचायत समिती कार्यालय श्रीवर्धन महाराष्ट्र भूषण आदरणीय ती.डॉ.श्री.नानासाहेब धर्माधिकारी सभागृह येथे घेणेंत आली. त्या सभेचे इतिवृत्त भाग-१ व २**

**इतिवृत्त भाग १**

| सभेची तारीख व वेळ | उपस्थित सदस्य | उपस्थित अधिकारी / कर्मचारी |
|---|---|---|
| दिनांक १४/०८/२०२६ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता | १) मा.श्री. सचिन नंदाकर किर सो.<br>सभापती पंचायत समिती.<br>२) मा.श्रीम.पुजा प्रशांत शिंदे साो.<br>उपसभापती पंचायत समिती<br>३) मा.श्री. सुकुमार दत्तात्रेय तोंडलेकर साो.<br>पंचायत समिती सदस्य<br>४) मा.श्रीम. अस्मिता प्रदर्शन चोरगे<br>पंचायत समिती सदस्य | १) सचिव तथा गट विकास अधिकारी,पं.स.श्रीवर्धन<br>२) पशुधन विकास अधिकारी, पं.स.श्रीवर्धन<br>३) तालुका आरोग्य अधिकारी,श्रीवर्धन<br>४) उपअभियंता<br>(ग्रा.पा.पु.),रा.जि.प.उपविभाग,म्हसळा<br>५) उपअभियंता (बांध.)<br>(प्र),रा.जि.प.उपविभाग,श्रीवर्धन<br>६) बाल विकास प्रकल्प अधिकारी,<br>ए.बा.वि.से.यो.श्रीवर्धन<br>७) गट शिक्षणाधिकारी (प्र),पं.स.श्रीवर्धन<br>८) तालुका कृषी अधिकारी,श्रीवर्धन (प्रतिनिधी)<br>९) विस्तार अधिकारी (पंचायत) १ पं.स.श्रीवर्धन<br>१०) विस्तार अधिकारी (आरोग्य) (प्र.),पं.स.श्रीवर्धन<br>११) विस्तार अधिकारी (कृषी) (प्र.),पं.स.श्रीवर्धन<br>१२) सहाय्यक लेखाधिकारी,पं.स.श्रीवर्धन (प्रतिनिधी)<br>१३) शाखा अभियंता,पं.स.श्रीवर्धन (प्रतिनिधी)<br>१४) कनिष्ठ अभियंता,पं.स.श्रीवर्धन<br>१५) सहाय्यक प्रशासन अधिकारी, (प्र) पं.स.श्रीवर्धन<br>१६) कनिष्ठ प्रशासन अधिकारी,पं.स.श्रीवर्धन<br>१७) पशुधन पर्यवेक्षक,पं.स.श्रीवर्धन.<br>१८) गटसन्वयक (MSRLM) (प्र.) ,पं.स.श्रीवर्धन<br>१९) कनिष्ठ सहाय्यक (प्रशासन),पं.स.श्रीवर्धन |

**पंचायत समितीची मासिक सर्वसाधारण सभा शुक्रवार दिनांक १४/०८/२०२६ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता पंचायत समिती कार्यालय श्रीवर्धन महाराष्ट्र भूषण आदरणीय तीर्थ.डॉ.श्री.नानासाहेब धर्माधिकारी सभागृह येथे घेणेंत आली. त्या सभेचे इतिवृत्त भाग-१ व २**

## <u>संक्षिप्त इतिवृत्त भाग-१</u>

सभेच्या प्रारंभी मा.श्रीम.पुजा प्रशांत शिंदे सो. उपसभापती श्रीवर्धन यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळयास पुष्पहार अर्पण केला व सर्वानी राष्ट्रगीत / महाराष्ट्र गीत म्हटले.

श्री.राजू दुंदा किरवे सचिव तथा गट विकास अधिकारी यांनी पंचायत समितीचे सर्वसाधारण सभेस उपस्थित मा.श्री. सचिन नंदाकर किर सो.सभापती, मा.श्रीम.पुजा प्रशांत शिंदे सो. उपसभापती, मा. श्री. सुकुमार दत्तात्रेय तोंडलेकर सो, पं.स.सदस्य, मा.श्रीम. अस्मिता प्रदर्शन चोरगे सो, पं.स.सदस्या, यांचे पंचायत समितीच्या वतीने स्वागत केले तसेच सभेस उपस्थित सर्व खाते प्रमुख, अधिकारी व कर्मचारी यांचे पंचायत समितीच्या वतीने स्वागत करुन सभेच्या कामकाजास सुरुवात करावी अशी विनंती मा.सभापती सो यांना केली.

मा.श्री. सचिन नंदाकर किर सो., सभापती यांनी सभेस उपस्थित मा.श्रीम.पुजा प्रशांत शिंदे सो.उपसभापती, मा. श्री. सुकुमार दत्तात्रेय तोंडलेकर सो. पं.स.सदस्य, मा.श्रीम. अस्मिता प्रदर्शन चोरगे,पं.स.सदस्या, मा.श्री.राजू दुंदा किरवे गट विकास अधिकारी तथा सचिव यांचे पंचायत समितीच्या वतीने स्वागत केले तसेच उपस्थित सर्व खातेप्रमुख अधिकारी व कर्मचारी यांचे देखील पंचायत समितीच्या वतीने स्वागत केले. त्यानंतर मा.सभापती यांनी गट विकास अधिकारी तथा सचिव यांना सभेचे कामकाजास सुरूवात करणेबाबत सुचित केले.

## <u>दु:खवटा ठराव</u>

दु:खवटा ठराव नव्हते

## <u>अभिनंदन ठराव</u>

१) जनता प्रसारक शिक्षण मंडळ बोर्लीपंचतनच्या संचालक मंडळावर पंचायत समितीचे माजी सभापती व विद्यमान पंचायत समिती सदस्य श्री.सुकुमार दत्तात्रेय तोंडलेकर यांची निवड झालेबद्दल ही पंचायत समिती सर्वानुमते अभिनंदन ठराव पारित करत आहे.

२) पंचायत समितीचे माजी सभापती व विद्यमान पंचायत समिती सदस्य श्री.सुकुमार दत्तात्रेय तोंडलेकर यांची श्री. मोहनलाल सोनी विद्यालय बोर्लीपंचतन या शैक्षणिक समितीच्या संचालक पदी निवड झाले बद्दल ही पंचायत समिती सर्वानुमते अभिनंदन ठराव पारित करत आहे.

३) मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत ग्रामपंचायत रानवलीने जिल्हास्तरावर प्रथम क्रमांक संपादन करुन पुरस्कार मिळवल्याबद्दल पंचायत समिती श्रीवर्धन मार्फत रानवली ग्रामपंचायतीचे सरपंच, ग्रामसेवक आणि समस्थ ग्रामस्थांचे अभिनंदन करणारा ठराव ही पंचायत समिती अभिनंदन ठराव पारित करत आहे.

**<u>विषय क्र १</u> :-** मागिल मासिक सभेचे इतिवृत्त वाचून मंजूर करणे.

मागिल मासिक सभेचे इतिवृत्ताचे वाचन श्री.राजू दुंदा किरवे सचिव तथा गट विकास अधिकारी यांनी केले व ते सर्वानुमते मंजूर करणेंत आले.

**<u>विषय क्र २</u> :-** मागिल मासिक सभेतील ठराव पूर्ततेचा आढावा घेणे.

मागिल मासिक सभेतील ठरावावरील व चर्चेवरील केलेल्या कार्यवाहीचे वाचन श्री.राजू दुंदा किरवे सचिव तथा गट विकास अधिकारी यांनी केले व ठराव पूर्ततेचा आढावा घेणेंत आला.

**<u>विषय क्र ३</u> :-** मा.सदस्यांनी विचारलेल्या लेखी प्रश्नांना उत्तरे देणे.

मा.सदस्यांचे लेखी प्रश्न नव्हते.

**विषय क्र ४ :-** मा.सदस्यांचे रजेचे अर्ज मंजूर करणे.
मा.सदस्यांचे रजेचे अर्ज नव्हते.

**विषय क्र ५ :-** महत्वाच्या पत्रव्यवहाराचे वाचन करणे.
महत्वाचे पत्रव्यवहार वाचनासाठी नव्हते.

**विषय क्र. ६ :-** तालुक्यातील खाते प्रमुखांकडील विकास कामांचा आढावा घेणे.

**पशुसंवर्धन :-** श्री.संदिप इंदूलकर पशुधन विकास अधिकारी यांनी त्यांच्या विभागाचा आढावा पुढील प्रमाणे दिला सध्या पशुधनाच्या लसीकरणाची मोहिम सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. किसान क्रेडीट कार्ड योजने अंतर्गत शेतकऱ्यांना १ लाख ६० हजार रूपयां पर्यंत कमी व्याजदरात कर्ज उपलब्ध करून देणाऱ्या योजनेबद्दल त्यांनी माहिती दिली.

यावर मा.गट विकास अधिकारी तथा सचिव यांनी मोकाट जनावरे विशेषत: मोकाट कुत्र्यांबाबत विभागा मार्फत योग्य कार्यवाही केली जावी असे सांगितले.

यावर श्री.संदिप इंदूलकर पशुधन विकास अधिकारी यांनी भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त करणे हे पशुसंवर्धन विभागाच्या अखत्यारीत येत नाही मात्र एन.जी.ओ मार्फत त्यांना पकडून दिल्यास लसीकरण करणे शक्य होईल असे सांगितले.

त्यावर मा.सदस्य श्री.सुकुमार दत्तात्रेय तोंडलेकर यांनी मोकाट कुत्रे नागरिकांना चावा घेत असल्या बाबत चिंता व्यक्त केली तसेच या मागील संभाव्य कारणांची माहिती द्यावी असे सांगितले.

यावर श्री.संदिप इंदूलकर पशुधन विकास अधिकारी यांनी काही प्रसंगी भटक्या कुत्र्यांना विविध लोकांकडुन त्रास दिला जातो त्यामुळे ते प्रतिक्रियात्मक चावा घेतात असे सांगितले.

त्यावर मा.सदस्य श्री.सुकुमार दत्तात्रेय तोंडलेकर यांनी ग्रामपंचायत हद्दीमध्ये कोंबडी व मटण व्यावसायीक न वापरात येणाऱ्या वस्तू उघड्यावर टाकतात त्या वस्तू व पदार्थ या कुत्र्यांनी खाल्यास त्यांच्यामध्ये आक्रमक स्वभाव गुण जन्माला येतो असे सांगितले. त्यामुळे ग्रामपंचायत हद्दितील व्यावसायीकांनी उघड्यावर खराब कचरा टाकू नये व जर असे निदर्शनास आले तर त्यांच्यावर कडक कारवाई करण्यात येईल असे पत्र संबंधित ग्रामपंचायतीने द्यावे असे सांगितले.

**तालुका आरोग्य अधिकारी :-** श्री.नरेश खोत तालुका आरोग्य अधिकारी प्रतिनिधी यांनी त्यांच्या विभागाचा आढावा दिला त्यामध्ये त्यांनी दोन वैद्यकिय अधिकारी पदांच्या जागा रिक्त आहेत असे सांगितले.

यावर मा.सभापती श्री.सचिन नंदाकर किर, यांनी कोणत्या जागा रिक्त आहेत व त्याबाबत काय उपाययोजना करण्यात आली आहे असे विचारले.

यावर श्री.नरेश खोत तालुका आरोग्य अधिकारी प्रतिनिधी यांनी बागमांडला आणि तालुका आरोग्य कार्यालयातील जागा रिक्त असून बागमांडला येथील चार्ज बोर्लीपंचतन येथील डॉ. शिंदे यांच्याकडे दिला असल्याची माहिती त्यांनी सांगितले. बी.सी.जी लसिकरण २८.७% पुर्ण झाले आहे. एम.आर.१ अंतर्गत ३०.१% लसीकरण पूर्ण झाले आहे. टी.टी १० वर्षाचा डोस याअंतर्गत ३४.४% लसीकरण पूर्ण झाले आहे. ३५० पैकी २३९ गरोदर मातांची नोंदणी पूर्ण झालेली आहे. तसेच सध्या कोणतेही साथीचे आजार पसरले नाहीत असे त्यांनी सांगितले.

यावर मा.उपसभापती श्रीम.पुजा प्रशांत शिंदे यांनी साथीचे आजार पसरले तर काय उपाययोजना केल्या जाणार आहेत असे विचारले.

त्यावर श्री.नरेश खोत तालुका आरोग्य अधिकारी प्रतिनिधी यांनी साथीच्या आजाराचा प्रादुर्भाव झाल्यास त्यावर नियंत्रण करण्यासाठी साथ नियंत्रण पथक स्थापण करण्यात आले आहे असे सांगितले. जलशुद्धीकरण औषध सध्या उपलब्ध नसून जलशुदधीकरण करण्यास आरोग्य विभागाकडून प्राधान्य दिले जाते असे त्यांनी सांगितले.

यावर मा.गट विकास अधिकारी यांनी खालापूर येथे झालेल्या आढावा सभेत मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी औषधे उपलब्ध नसतील तर त्याबाबत त्यांना तात्काळ अवगत करण्याच्या सुचना देल्या असल्याचे सांगितले.

यानांतर मा.पं.स सदस्य श्री.सुकुमार दत्तात्रेय तोंडलेकर यांनी बोर्ली प्रा.आ.केंद्र चे शिफ्टींग का झाले नाही असे विचारले.

यावर श्री.नरेश खोत तालुका आरोग्य अधिकारी प्रतिनिधी यांनी नवीन इमारतीचे भाडे ३.५ लाख रूपये आहे असे सांगितले.

यावर मा.पं.स सदस्य श्री.सुकुमार दत्तात्रेय तोंडलेकर यांनी मागील मासिक सभेत याबाबत चर्चा करण्यात आल्याचे सांगितले. प्राथमिक शाळा, कन्या शाळा, मराठी मुलांची शाळा या ठिकाणी खोल्या उपलब्ध असताना प्रा.आ.केंद्र इमारत शिफ्ट का केली जात नाही असे विचारले. या ठिकाणी ओ.पी.डी सुरू असतांना जर अपघात झाला तर त्याचे गंभीर दुष्परिणाम भोगावे लागतील असे त्यांनी सांगितले. तसेच भविष्यात जर काही दुर्घटना झाली तर त्याची जबाबदारी संबंधित वैद्यकिय अधिकाऱ्यांची असल्याबाबत लेखी मा.ग.वि.अ यांना सादर करावे असे त्यांनी सांगितले.

यावर मा.सभापती श्री.सचिन नंदाकर किर, यांनी मागील सभेनंतर शाळेच्या खोल्यांची पाहणी करून त्याबाबत माहिती देण्याचे तालुका आरोग्य अधिकारी आणि गटशिक्षणाधिकारी यांनी आश्वासन दिले होते मात्र याबाबत कोणतीही कार्यवाही केली नसल्याचे सांगत याबाबत नाराजी व्यक्त केली.

यावर मा.पं.स सदस्य श्री.सुकुमार दत्तात्रेय तोंडलेकर यांनी बोर्ली येथे कोण डॉक्टर आहेत असे विचारले.

यावर श्री.नरेश खोत तालुका आरोग्य अधिकारी प्रतिनिधी यांनी बोर्ली येथे डॉ. सत्यभामा दुधाडे व डॉ.चंचल या कार्यरत आहेत असे सांगितले.

यानंतर मा.पं.स सदस्य श्री.सुकुमार दत्तात्रेय तोंडलेकर यांनी आदगांव येथे कोण डॉक्टर आहेत? तेथे साधारणत: किती ओ.पी.डी होतात व ओ.पी.डी साठी कोणत्या ठिकाणचे रूग्ण येतात असे विचारले?

यावर श्री.नरेश खोत तालुका आरोग्य अधिकारी प्रतिनिधी यांनी आदगांव येथे डॉ.विठ्ठल खटके हे कार्यरत असल्याचे सांगितले त्या ठिकाणी साधारणत: ४० ते ५० ओ.पी.डी होतात व सर्वे वेळास या ठिकाणचे रुग्ण या ठिकाणी येतात असे यांगितले.

यावर मा.पं.स सदस्य श्री.सुकुमार दत्तात्रेय तोंडलेकर यांनी दिघी च्या पाण्याचे नमुने पाठविले आहेत का असे विचारले.

यावर श्री.नरेश खोत तालुका आरोग्य अधिकारी प्रतिनिधी हे "होय" म्हणाले. तसेच सदर पाण्याचा अहवाल पिण्यास अयोग्य असा अहवाल आल्याचे त्यांनी सांगितले.

यावर मा.सभापती श्री.सचिन नंदाकर किर, यांनी कोणते पाणी तपासले आहे असे विचारले.

यावर श्री.नरेश खोत तालुका आरोग्य अधिकारी प्रतिनिधी यांनी विहीरीचे पाणी चेक केले आहे असे सांगितले.

यावर मा.पं.स सदस्य श्री.सुकुमार दत्तात्रेय तोंडलेकर यांनी कंटेनर मध्ये पाणी साचुन राहते यामुळे डासांची उत्पत्ती होऊन साथीचे आजार पसरण्याची शक्यता असते ते टाळण्यासाठी कोणती कार्यवाही केली जात आहे असे विचारले.

यावर श्री.नरेश खोत तालुका आरोग्य अधिकारी प्रतिनिधी यांनी याबाबत आरोग्य पथक ठिकठिकाणी भेट देत असून साचलेल्या पाण्याचे कंटेनर रिकामे केले जात आहेत व नष्ट केले जात आसल्याचे त्यांनी सांगितले साथीचे आजार पसरू नये म्हणून योग्य ती कार्यवाही केली जात आहे असेही त्यांनी सांगितले.

यावर मा.उपसभापती श्रीम.पुजा प्रशांत शिंदे यांनी वाळवटी प्रा.आ.केंद्र मध्ये साधारणत: किती ओ.पी.डी होतात व तेथील डॉक्टर मासिक सभेस उपस्थित आहेत का असे विचारले.

यावर श्री.नरेश खोत तालुका आरोग्य अधिकारी प्रतिनिधी यांनी वाळवटी येथे साधारणत: ५० पेक्षा जास्त ओ.पी.डी होतात असे सांगितले संबंधित डॉ.सभेस उपस्थित नसल्याचे त्यांनी सांगितले.

यावर मा.पं.स सदस्य श्री.सुकुमार दत्तात्रेय तोंडलेकर यांनी डॉक्टर अनुपस्थित राहणे ही बाब अयोग्य असल्याचे सांगितले तसेच प्रा.आ.केंद्र अंतर्गत असणाऱ्या डॉक्टरांपैकी किमान एक डॉक्टर मासिक सभेस उपस्थित असणे आवश्यक असल्याचे सांगितले.

त्यावर मा.सभापती श्री.सचिन नंदाकर किर, यांनी पावसाळ्याचे ३ महिने हे आरोग्याच्या द्रुष्टीने जास्त महत्वाचे असून या काळात योग्य ती काळजी घ्यावी असे सांगितले.

यावर श्री.नरेश खोत_तालुका आरोग्य अधिकारी प्रतिनिधी यांनी याबाबत आरोग्य विभागाकडून योग्य दक्षता घेतली जात आहे असे सांगितले. तसेच गणेशोत्सवासाठी येणाऱ्या पाहुण्यांची आरोग्य तपासणी केली जात असून जर काही लक्षणे आढळली तर त्यावर तात्काळ उपचार केले जातात असे त्यांनी सांगितले.

यावर मा.पं.स सदस्य श्री.सुकुमार दत्तात्रेय तोंडलेकर यांनी सर्व ग्रामपंचायतींना विशेषत: कुडगांव, दिघी, आदगांव, भरडखोल या ठिकाणी औषध फवारणी करण्याबाबत पत्र देण्यात यावे असे सांगितले.

यावर मा.उपसभापती श्रीम.पुजा प्रशांत शिंदे यांनी मेघरे या उपकेंद्राबाबत माहिती द्यावी असे श्री. श्री.नरेश खोत यांना सांगितले. हा भाग दुर्गम असून त्या ठिकाणी महिलांची गैरसोय होत आहे तसेच आठवड्यातून एकदा तरी या ठिकाणी भेट दिली जावी असे सांगितले.

यावर श्री.नरेश खोत_तालुका आरोग्य अधिकारी प्रतिनिधी यांनी दांडगुरी येथे चार्ज असणारे डॉक्टर मेघरे येथे आठवड्यातून एकदा भेट देतात असे सांगितले.

यावर मा.पं.स सदस्य श्री.सुकुमार दत्तात्रेय तोंडलेकर यांनी लसिकरण पुर्ण झाले आहे का तसेच काही कमतरता आहे का असे विचारले.

त्यावर श्री.नरेश खोत_तालुका आरोग्य अधिकारी प्रतिनिधी यांनी लसीकरण पुर्ण झाले आहे असे सांगितले तसेच लसींची कमतरता नाही असेही सांगितले.

**तालुका कृषी :-** तालुका कृषी अधिकारी प्रतिनिधी श्री.अभिजीत गावडे यांनी कृषी विभागाचा आढावा पुढील प्रमाणे दिला. Maha DBT अंतर्गत १७,५०० झाडे उपलब्ध करून देण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

यावर मा.सभापती श्री.सचिन नंदाकर किर, यांनी किती झाडांचे वाटप करण्यात आले आहे असे विचारले.

यावर श्री.अभिजीत गावडे तालुका कृषी अधिकारी प्रतिनिधी यांनी ८,५०० झाडांचे वाटप करण्यात आल्याचे सांगितले या योजने अंतर्गत शेतकऱ्यांना ५० काजूची रोपे मोफत मिळणार असून त्यासाठी फार्मर आय डी व २५ गुंठे जमीन असणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. १५ बाय १५ च्या शेततळ्यासाठी ७५,०००/- रूपये पर्यंत अनुदान मिळते तसेच प्लास्टीकसाठी अतीरिक्त ७५,०००/- रुपये मिळते असे त्यांनी सांगितले.

यावर मा.पं.स सदस्य श्री.सुकुमार दत्तात्रेय तोंडलेकर यांनी शेततळ्यासाठी किती गुंठे क्षेत्राची अट आहे? यासाठी ३५ सेक्शनचा ७/१२ उतारा चालतो का? तसेच इतर काही अटी आहेत का? असे विचारले.

त्यावर श्री.अभिजीत गावडे तालुका कृषी अधिकारी प्रतिनिधी यांनी छोट्या शेततळ्यासाठी ७ ते ८ गुंठे जमीन तर मोठ्या शेततळ्यासाठी २५ ते ३० गुंठे जमीन असावी असा निकष आहे सांगितले. यासाठी ३५ सेक्शनचा ७/१२ उतारा चालत नाही आणि ज्या ठिकाणी शेततळे करावयाचे आहे त्या ठिकाणी ३ मीटर खोलीपर्यंत कातळ नसावा असे सांगितले यानंतर त्यांनी VBG RAM G योजना, भाऊसाहेब फुंदकर योजना, अवजार योजना, सुगंधी औषधी वनस्पती योजना व कृषी विभागाच्या Framework for Fertilizer या App ची माहिती त्यांनी दिली या App मध्ये नोंद केल्या शिवाय खते मिळणार नसल्याचे त्यांनी सांगितले.

यावर मा.पं.स सदस्य श्री.सुकुमार दत्तात्रेय तोंडलेकर यांनी याबाबत सर्व ग्रामपंचायतींना माहिती द्यावी व ही माहिती शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवावी असे सांगितले.

त्यावर श्री.अभिजीत गावडे तालुका कृषी अधिकारी प्रतिनिधी हे "होय" असे म्हणाले.

यानंतर पं.स सदस्या श्रीम.अस्मिता प्रदर्शन चोरगे, यांनी गोपीनाथ मुंढे अपघात योजने अंतर्गत लाभ घेण्यासाठी कोणत्या कागदपत्रांची आवश्यकता आहे तसेच हा लाभ किती दिवसात शेतकऱ्याच्या खात्यावर वर्ग होतो असे विचारले.

त्यावर श्री.अभिजीत गावडे तालुका कृषी अधिकारी प्रतिनिधी गोपीनाथ मुंढे अपघात योजनेसाठी ७/१२ उतारा ८ अ उतारा व मृत्यू प्रमाणपत्र आवश्यक असल्याचे सांगितले कागदपत्रांची पुर्तता केल्यानंतर दोन महिन्याच्या आत हा लाभ खात्यावर वर्ग केला जातो असे त्यांनी सांगितले.

**उप विभाग बांधकाम :-** श्री. स्वप्निल आंधळे यांनी उप विभाग बांधकाम विभागाचा संक्षिप्त आढावा दिला.

यावर मा.पंचायत समिती सदस्य श्री.सुकुमार दत्तात्रेय तोंडलेकर यांनी सदर आढाव्याची टिपणी सादर करण्यात आली आहे का असे विचारले.

त्यावर सहाय्यक अभियंता श्री.स्वप्निल आंधळे हे "होय" असे म्हणाले.

तसेच सन २०२६-२७ मध्ये कोणतीही नवीन काम सुरू नसल्याचे त्यांनी सांगितले. सन २०२५-२६ मध्ये खासदार निधीमध्ये एकुण १२ कामे मंजूर असुन यापैकी ३ कामे पुर्ण झालेली. असून ९ कामे प्रगतीत आहेत. आमदार निधीमधील ६ कामे आहेत त्यापैकी २ काम पूर्ण झाले असून ४ कामे प्रगतीत आहेत. ५०५४ अंतर्गत ७ जिल्हा रस्त्यांची कामे असून सर्व कामे पूर्ण झालेली आहेत. ३०५४ अंतर्गत ग्रामीण रस्त्यांची ५ पैकी ५ कामे कामे पुर्ण झालेली आहेत. ५०५४ अंतर्गत साकव बांधकामाची २ कामे असून २ काम पूर्ण झाले आहे. ३६०४ व ०५३५ 'क' श्रेणी यात्रास्थळ विकासा अंतर्गत ३ कामे मंजूर असून त्यापैकी १ काम पूर्ण झालेले आहे. १ काम प्रगतीत असून १ काम अद्याप सुरू झालेले नाही. जिल्हा खनिज प्रतिष्ठन १३ कामे असुन त्यापैकी ३ कामे पुर्ण झालेली ओत. ५ कामे प्रगतीत आहेत ४ कामे सुरू झालेली नसून १ काम निविदा स्तरावर आहे. डोंगरी विभाग विकास कार्यक्रम अंतर्गत १० कामे असून त्यापैकी ६ कामे पुर्ण झालेली आहेत. लेखाशिर्ष २२३६-२२८२ एकात्मिक बाल विकास सेवा अंतर्गत २ कामे असून त्यापैकी १ काम पुर्ण झाले आहे.

यावर मा.पं.स सदस्या श्रीम.अस्मिता प्रदर्शन चोरगे यांनी वावे बौध्दवाडी समाजमंदीर आणि आराठी येथील मातंग सभागृह बांधणे याला प्रशासकिय मान्यता मिळाली आहे का? ओ विचारले.

त्यावर सहाय्यक अभियंता श्री.स्वप्निल आंधळे यांनी सदर कामे त्यांच्या विभागाच्या अखत्यारित येत नसल्यामुळे याबाबत माहिती नसल्याचे सांगितले.

यावर श्री. नागे विस्तार अधिकारी पंचायत यांनी सदर कामे समाजकल्याण विभागाच्या अखत्यारित येत असल्याचे सांगितले ही कामे जिल्ह्याला पाठवण्यात आलेली आहेत मात्र त्यांना अद्याप मंजुरी मिळाली नसल्याचे त्यांनी सांगितले.

त्यावर मा.श्री. राजू किरवे ग.वि.अ यांनी मौजे वाळवटी सुतार आळी ता.श्रीवर्धन येथे सामाजिक सभागृह बांधणे तसेच मौजे वाळवटी कुणबीवाडी येथे सामाजिक सभागृह ही कामे सुरू का झाली नाहीत असे विचारले तसेच ग्रुप ग्रामपंचायत नागलोली, देवखोल येथील गणपत सोलकर यांच्या घरापासून मंदिराकडे जाणारा रस्ता तयार करणे या कामाच्या प्रगतीबाबत विचारले.

यावर सहाय्यक अभियंता श्री.स्वप्निल आंधळे यांनी सुतारआळी आणि कुणबीवाडी येथील समाजगृह बांधणे या कामांची वर्क ऑर्डर झालेली आहे असे सांगितले तसेच नागलोली येथील गणपत सोलकर यांच्या घरापासून मंदिराकडे जाणारा रस्ता करणे हे काम सुरू असून त्याच्या कारपेटचे काम बाकी असल्याचे सांगितले.

यावर मा.सभापती श्री.सचिन नंदाकर किर, यांनी देवखोल मंदिर वॉल कंम्पाऊंड च्या कामाबद्दल विचारणा केली.

त्यावर सहाय्यक अभियंता श्री.स्वप्निल आंधळे यांनी हे काम निविदा स्तरावर असल्याचे सांगितले.

यावर मा.सभापती श्री.सचिन नंदाकर किर, यांनी हे काम यापुर्वी झाले आहे का असे विचारले. तसेच या कामाची निविदा झाल्यावर त्याबाबत त्यांना अवगत केले जावे असे सांगितले.

यावर सहाय्यक अभियंता श्री.स्वप्निल आंधळे हे "होय" म्हणाले तसेच हे काम यापुर्वी झाले नसल्याचे त्यांनी सांगितले.

**राज्य परिवहन महामंडळ:-** श्री.आनाजी मस्कर प्रतिनिधी आगार प्रमुख श्रीवर्धन यांनी सभेस उपस्थित राहून त्यांच्या विभागाचा आढावा पुढील प्रमाणे दिला. श्रीवर्धन आगारामध्ये कर्मचारी कमतरता समस्या असल्यामुळे आगारातून सुटणाऱ्या गाड्याना विलंब होत असल्याची माहिती त्यांनी दिली.

त्यावर मा.सभापती श्री.सचिन नंदाकर किर, यांनी श्रीवर्धन आगारातून नियमीत धावणाऱ्या काही मार्गावरील गाड्या बंद का आहेत असे विचारले.

यावर श्री.आनाजी मस्कर प्रतिनिधी आगार प्रमुख श्रीवर्धन यांनी संबंधित मार्गावर उत्पन्नाचे स्रोत कमी असल्यामुळे या गाड्या बंद असल्याचे सांगितले. तसेच गणेशोत्सवात या गाड्या परत सुरू होणार असल्याचे त्यांनी सांगितले.

यावर मा.सभापती श्री.सचिन नंदाकर किर, यांनी शाळेच्या वेळेत सुटणाऱ्या गाड्यांना विलंब होत असल्यामुळे शालेय विद्यार्थ्यांचे नुकसान होत आहे असे सांगितले.

त्यावर श्री.आनाजी मस्कर प्रतिनिधी आगार प्रमुख श्रीवर्धन यांनी यापुढे गाड्यांना विलंब होणार नाही याची दक्षता घेतली जाईल असे सांगितले.

यावर पं.स सदस्या श्रीम.अस्मिता प्रदर्शन चोरगे यांनी नादुरूस्त तसेच गळती असणाऱ्या बस या दुरुस्त केल्या न जाण्यामागील कारण विचारले.

त्यावर श्री.आनाजी मस्कर प्रतिनिधी आगार प्रमुख श्रीवर्धन यांनी अशी समस्या असणाऱ्या बस दुरूस्ती करत आहोत असे सांगितले.

यावर मा.सभापती श्री.सचिन नंदाकर किर, यांनी आगारामध्ये साधारणत: किती कर्मचारी कमतरता आहे असे विचारले.

त्यावर श्री.आनाजी मस्कर प्रतिनिधी आगार प्रमुख श्रीवर्धन यांनी आगारामध्ये साधारणत: ५० कर्मचारी कमी आहेत असे सांगितले.

**म.रा.वि.वि.कं.लि.** :- कनिष्ठ अभियंता श्री.राजेंद्र बनकर यांनी म.रा.वि.वि.कं.लि विभागाचा आढावा दिला. त्यांच्याकडे सध्या दिघीचा चार्ज असून दिघी ग्रामपंचायत व कुडगांव ग्रामपंचायत हद्दीमध्ये सध्या ९ लाखांपर्यंत दुरूस्तीचे काम सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. सोलार योजनेअंतर्गत ११०० लोकांनी रजिस्टेशन केले होते त्यापैकी ७०० अर्ज मंजुर झाले आहेत असे त्यांनी सांगितले.

यावर मा.पं.स सदस्य श्री.सुकुमार दत्तात्रेय तोंडलेकर यांनी विद्यूत विभागाने प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये जाऊन जन जागृती करावी असे सुचविले तसेच वि.कं मार्फत कोणकोणत्या ठिकाणी सभा घेण्यात आल्या होत्या असे विचारले.

त्यावर कनिष्ठ अभियंता श्री.राजेंद्र बनकर यांनी दिघी आणि बोर्ली येथे सभा घेण्यात आल्या आहेत असे सांगितले.

यावर पं.स सदस्या श्रीम.अस्मिता प्रदर्शन चोरगे यांनी म.रा.वि.वि.कं मार्फत Whats app गृप मध्ये सुचना का दिल्या जात नाहीत? तसेच ऑनलाईन पेमेंट करण्यात विलंब झाल्यास भरणा केलेली रक्कम पुन्हा पुढील देयकामध्ये दाखवली जात असल्याचे सांगितले. व यावर काय उपाय करता येऊ शकतो असेही विचारले.

त्यावर कनिष्ठ अभियंता श्री.राजेंद्र बनकर यांनी ज्या ग्रहकांचे विद्युत कंपनीकडे संपर्क क्रमांक आहेत त्या ग्राहकांना Whats app गृप मार्फत सुचना पाठवली जात असल्याचे सांगितले. तसेच एकदा भरणा केलेली रक्कम पुन्हा भरणा करावा लागत नसल्याचेही त्यांनी सांगितले. जर ही समस्या भेडसाऊ नये असे वाटत असेल तर वेळेवर वीज बील देयकाचा भरणा करणे हा एकमेव उपाय असल्याचे त्यांनी सांगितले.

त्यावर मा.उपसभापती श्रीम.पुजा प्रशांत शिंदे यांनी मीटर बंद करताना संबंधित ग्राहकांना पुर्वी सुचना दिली जाते का असे विचारले.

त्यावर कनिष्ठ अभियंता श्री.राजेंद्र बनकर यांनी जर ग्राहकांने ४५ दिवस वीज बील भरणा केला नाही तर तात्पुरत्या स्वरूपात आणि ९०दिवस वीज बील भरणा केला नाही तर कायमस्वरूपी विद्यूत कनेक्शन तोडले जाते असे सांगितले पण कायमस्वरूपी कनेक्शन तोडण्यापुर्वी त्याची पूर्वकल्पना दिली जाते असे सांगितले.

यावर माननीय सभापती श्री. सचिन नंदाकर किर यांनी स्मार्ट मीटर बाबत येणाऱ्या समस्येबाबत MSEB कडुन काय उपाययोजना करण्यात येत आहेत असे विचारले.

यावर श्री. राजेंद्र बनकर यांनी स्मार्ट मीटर बाबत जनतेमध्ये SOCIAL MEDIA मुळे गैरसमज झाले आहेत असे सांगितले. तसेच यासंदर्भात असणारे गैरसमज दूर करण्यासाठी MSEB कडून उपाययोजना सुरू आहेत असे त्यांनी सांगितले.

यावर मा.सभापती श्री.सचिन नंदाकर किर, यांनी वाळवटी येथे ग्राहकांना न सांगता १५ मिटर काढण्यात आल्याचे सांगितले. तसेच स्थानिक रहिवासी इब्राहीम खाचूरीया यांची काहिही चूक नसतांना त्यांचा मिटर काढून नेण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

यावर श्री. राजेंद्र बनकर यांनी सदर ठिकाणी वीज चोरी पकडण्याचा ड्राईव्ह सुरू होता त्या दरम्यान मिटर मध्ये फेरफार व इतर गैरप्रकार करणाऱ्या सात ठिकाणी वीज चोरी पकडण्यात आल्या असून सदोष मिटर बदलण्यात आल्याचे सांगितले.

यावर मा.सभापती श्री.सचिन नंदाकर किर, यांनी गैरप्रकार करणाऱ्या ग्राहकांवर योग्य ती कारवाई केली जावी मात्र सामान्य व प्रामाणीक ग्राहकांना कोणताही त्रास कंपनी मार्फत होऊ नये असे सांगितले.

यावर मा.उपसभापती श्रीम.पुजा प्रशांत शिंदे यांनीही मिटर काढतांना ग्राहकांना सुचना देत जाव्यात व सहकार्याची भावना ठेवावी असे सांगितले.

यावर श्री. राजेंद्र बनकर यांनी स्मार्ट मिटर बाबत प्रामाणिक ग्राहकांची कोणतीही तक्रार नाही असे सांगितले. तसेच जूने मिटर आणि नवीन स्मार्ट मिटर एकाच वेळी जोडून ग्राहकांना दाखविले असता दोन्ही मिटर मध्ये सारखाच विजेचा वापर होत असल्याचे सिध्द करून दाखविले आहे असे त्यांनी सांगितले. विजेचा दैनंदिन वापर दर्शविणाऱ्या महावितरण च्या ॲप बाबत त्यांनी माहिती दिली.

यावर मा.सदस्य श्री.सुकुमार दत्तात्रेय तोंडलेकर यांनी कार्ले गावातही विद्यूत कंपनीचे कर्मचारी अचानक गेल्यामुळे ग्रामस्थांमध्ये गोंधळ व भीतीचे वातावरण पसरल्याचे सांगितले. महावितरण कडून कनिष्ठ स्थरावरील कर्मचाऱ्यांना सामान्य जनतेशी सौजन्याने वागण्याच्या सुचना देण्यात याव्यात असेही त्यांनी सांगितले.

**सार्वजनिक बांधकाम:-** उप अभियंता (सा.बां.) -१ हे सभेस उपस्थित न राहिल्याने त्यांचेकडील विषयांचा आढावा सभागृहाला घेता आला नाही.

**सार्वजनिक बांधकाम (पर्यटन):-** उप अभियंता (सा.बां.) -पर्यटन हे सभेस उपस्थित न राहिल्याने त्यांचेकडील विषयांचा आढावा सभागृहाला घेता आला नाही.

**ए.बा.वि.से.यो:-** श्री.भरत कुबेर वि.अ सांख्यिकी (प्रतिनीधी) बाल विकास प्रकल्प अधिकारी कार्यालय यांनी त्यांच्या विभागाचा आढावा खालील प्रमाणे दिला. विभागामार्फत वर्षातून दोन वेळा आरोग्य तपासणी केली जाते. पुढील १५ दिवसांचे आरोग्य तपासणीसाठी Schedule तयार करण्यात आले असुन तालुक्यातील अती तीव्र कुपोषीत बालकांची संख्या ० असुन मध्यम तीव्र कुपोषित बालकांची संख्या १२ आहे असे त्यांनी सांगितले. तालुक्यातील एकूण अंगणवाड्या, ० पट असणाऱ्या अंगणवाड्या व ० ते ६ वयोगटातील बालकांच्या संख्येचा आढावा त्यांनी दिला.

यावर मा.सभापती श्री.सचिन नंदाकर किर, यांनी वडवली मुस्लीम मोहल्ला अंगणवाडीची मागणी केली होती त्या बाबत काय कार्यवाही करण्यात आली आहे असे विचारले.

यावर श्री.भरत कुबेर वि.अ सांख्यिकी यांनी या बाबत ३ वेळा प्रस्ताव सादर केला असून यास अद्याप मंजूरी मिळालेली नसल्याचे सांगितले.

यानंतर मा.उपसभापती श्रीम.पुजा प्रशांत शिंदे यांनी ३rd श्रेणी बालकांसाठी काय उपाययोजना करण्यात येत आहेत असे विचारले.

त्यावर श्री.भरत कुबेर वि.अ सांख्यिकी यांनी मुले कुपोषीत होऊ नयेत यासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना करण्यात येत आहेत तसेच कुपोषीत बालकांसाठी ग्राम बाल विकास केंद्र व घरपोच रेशन आहार योजना राबविण्यात येत असल्याचे सांगितले.

**<u>प्रादेशीक वन विभाग</u> :-** प्रादेशीक वन अधिकारी श्री. स्वप्निल चंभूले, वन विभाग श्रीवर्धन यांनी त्यांच्याकडील विषयांचा आढावा सभागृहाला दिला.

यावर मा.सदस्य श्री.सुकुमार दत्तात्रेय तोंडलेकर यांनी तालुक्याच्या हद्दीतील वन क्षेत्र कोठे आहे आणि ३५ सेक्शन अंतर्गत असणाऱ्या नियमावलीची माहिती विचारली तसेच यात असणाऱ्या घरांची घरपट्टी घेता येऊ शकते का व हे सेक्शन काढण्यासाठी काय करता येईल असे विचारले.

त्यावर प्रादेशीक वन अधिकारी श्री. स्वप्निल चंभूले, वन विभाग श्रीवर्धन यांनी आदगांव येथे ४०० ते ५०० एकर वन विभागाचे क्षेत्र आहे. १९७१ च्या केंद्र सरकारच्या कायद्या नुसार या बाबत कार्यवाही केली जाते सदर क्षेत्रामध्ये कोणत्याही प्रकारचे वनेतर काम करता येत नाही त्यामुळे घरपट्टी वसूली करता येणार नाही व हे सेक्शन काढण्यासाठी केंद्र सरकारच्या कायद्याची आवश्यकता आहे असे सांगितले.

यावर मा.सदस्य श्री.सुकुमार दत्तात्रेय तोंडलेकर यांनी वन क्षेत्राच्या सीमेत येणाऱ्या जमिनीतून पाणी योजना राबवता येऊ शकते का असे विचारले.

त्यावर प्रादेशीक वन अधिकारी श्री. स्वप्निल चंभूले, वन विभाग श्रीवर्धन यांनी वन विभागाच्या सहमतीने पाणी योजना राबविता येऊ शकते असे सांगितले.

यानंतर मा.उपसभापती श्रीम.पुजा प्रशांत शिंदे, यांनी वन विभागा मार्फत ग्रामस्थांसाठी काही योजना आहेत का? असे विचारले.

त्यावर प्रादेशीक वन अधिकारी श्री. स्वप्निल चंभूले, वन विभाग श्रीवर्धन यांनी प्रादेशीक वन विभागा मार्फत ग्रामस्थांसाठी पिक नुकसान भरपाई व्यतिरीक्त अन्य योजना नसल्याचे सांगितले. मात्र सामाजीक वनीकरण विभागा मार्फत ग्रामपंचायतींना मान्सुन कालावधीत रोपे पुरवली जातात असे सांगितले.

यावर मा.सदस्य श्री.सुकुमार दत्तात्रेय तोंडलेकर यांनी सामाजीक वन विभागा मार्फत कोण कोणती रोपे पुरवली जातात असे विचारले.

त्यावर प्रादेशीक वन अधिकारी श्री. स्वप्निल चंभूले, वन विभाग श्रीवर्धन यांनी सामाजीक वन विभागा मार्फत करंज, कांचन, शिसम, शिरस, आवळा तसेच आपटा यांसारखी जंगली झाडे व काजू व बांबू अशी रोपे पुरविली जातात असे सांगितले.

यावर मा.सभापती श्री.सचिन नंदाकर किर, यांनी माकडांकडून होणाऱ्या नुकसानी बाबत भरपाई मिळते का तसेच याबाबत काही कार्यवाही करण्यात आली आहे का? असे विचारले.

त्यावर प्रादेशीक वन अधिकारी श्री. स्वप्निल चंभूले, वन विभाग श्रीवर्धन यांनी वन विभागा मार्फत माकडांकडून होणाऱ्या नुकसानी साठी भरपाई बाबत योजना नसल्याचे सांगितले तसेच याबाबत प्रस्ताव सादर करण्यात आले आहेत व ते प्रस्ताव मंजूर झाल्यास नुकसान भरपाई मिळू शकते असे सांगितले.

**सामाजिक वनीकरण:-** वन परिक्षेत्र अधिकारी श्रीवर्धन हे सभेस उपस्थित न राहिल्याने त्यांचेकडील विषयांचा आढावा सभागृहाला घेता आला नाही.

**खारभूमी:-** श्री.मुळीद उप विभागीय अधिकारी खारभूमी सर्वेक्षण व अन्वेषण उप विभाग श्रीवर्धन यांनी त्यांचेकडील विषयांचा आढावा सभागृहाला दिला त्यामध्ये त्यांनी त्यांच्या विभागाच्या अखत्यारित १० बांध प्रकल्प असल्याचे सांगितले. तसेच काही ठिकाणी देखभाल दुरूस्तीचे काम सूरू असून गालसुरे, यशवंती, वेळास - वडवली येथील अर्धे काम पुर्ण झाले असून अर्धे काम बाकी आहे असे त्यांनी सांगितले.

यावर मा.सभापती श्री.सचिन नंदाकर किर, यांनी वडवली येथील बंधाऱ्याचे बिल दिले आहे का? असे विचारले तसेच जर सदर बिल देण्यात आले नसेल तर त्यांना पुर्व सुचना दिल्याशिवाय ते अदा करण्यात येऊ नये असे सांगितले.

यावर श्री.मुळीद उप विभागीय अधिकारी खारभूमी सर्वेक्षण व अन्वेषण उप विभाग श्रीवर्धन हे "होय" असे म्हणाले.

यावर मा.सदस्य श्री.सुकुमार दत्तात्रेय तोंडलेकर यांनी कोळंबी प्रकल्प खारभूमी विभागाच्या अखत्यारीत येतात का असे विचारले.

त्यावर श्री.मुळीद उप विभागीय अधिकारी खारभूमी सर्वेक्षण व अन्वेषण उप विभाग श्रीवर्धन यांनी कोळंबी प्रकल्प मत्स्य विभागाच्या अखत्यारीत येत असल्याचे सांगितले.

**ग्रामिण पाणी पुरवठा :-** श्री.व्यंकटेश माने कनिष्ठ अभियंता उप विभाग ग्रा.पा.पु यांनी ग्रा.पा.पु विभागाचा आढावा खालील प्रमाणे दिला. J.M.M अंतर्गत ६० पैकी ४६ कामे पूर्ण झाल्याचे त्यांनी सांगितले.

त्यावर मा.गट विकास अधिकारी यांनी काळिंजे येथील जागेची समस्या सोडवली आहे का असे विचारले.

यावर श्री.व्यंकटेश माने कनिष्ठ अभियंता उप विभाग ग्रा.पा.पु हे "नाही" म्हणाले.

त्यावर मा.सभापती श्री.सचिन नंदाकर किर, यांनी गालसुरे येथील कामाचे काय झाले व याचे कॉन्ट्रॅक्टर कोण आहे असे विचारले.

यावर श्री.व्यंकटेश माने कनिष्ठ अभियंता उप विभाग ग्रा.पा.पु यांनी गालसुरे येथील काम हस्तांतरण टप्यावर आहे मात्र अद्याप त्याचे हस्तांतरण झाले नाही असे सांगितले. तसेच सदर कामाचे कॉन्ट्रॅक्टर श्री.अरविंद पाशिलकर हे आहेत असे सांगितले.

त्यावर मा.सभापती श्री.सचिन नंदाकर किर, यांनी JMM व पाणी पुरवठा विभागाची स्वतंत्र बैठक आयोजीत करावी असे सांगितले.

यावर मा.गट विकास अधिकारी यांनी २ सप्टेंबर रोजी सर्व कॉन्ट्रॅक्टर संबंधित ग्रामसेवक व विभागातील अधिकाऱ्यांची बैठक आयोजित करावी असे सांगितले.

यानंतर श्री.व्यंकटेश माने कनिष्ठ अभियंता उप विभाग ग्रा.पा.पु यांनी येत्या दोन वर्षात कोणतेही बील देण्यात आले नाही व DPDC अंतर्गत ११ पैकी १० कामे पुर्ण झाले आहेत असे सांगितले. वेळास व भट्टीचा माळ या योजनांची GST बील झाले आहे असे त्यांनी सांगितले.

त्यावर मा.सभापती श्री.सचिन नंदाकर किर, यांनी पूर्ण माहिती घेऊनच बील द्या असे श्री.माने यांना सूचना दिली.

यावर मा.सदस्य श्री.सुकुमार दत्तात्रेय तोंडलेकर यांनी ग्राम पंचायत ला विचारात घेतल्याशिवाय व योजना पुर्ण झाली आहे याचा आढावा घेतल्याशिवाय ग्रामपंचायत कामाचा ताबा घेणार नाही अशा सूचना देण्यात याव्यात असे सांगितले.

**लघु पाटबंधारे उप विभाग कोलाड:-** उदय पाटील, अभियंता ग्रा.पा.पु यांनी उप विभागीय लघूपाटबंधारे उप विभाग कोलाड यांचेकडील विषयांचा आढावा सभागृहाला दिला.

**बंदर विभाग:-** बंदर निरीक्षक श्रीवर्धन हे सभेस उपस्थित न राहिल्याने त्यांचेकडील विषयांचा आढावा सभागृहाला घेता आला नाही.

**ल.सिं.(जलसंधारण) माणगांव:-** सहाय्यक अभियंता लघु सिंचन, माणगांव हे सभेस उपस्थित न राहिल्याने त्यांचेकडील विषयांचा आढावा सभागृहाला घेता आला नाही.

**तालुका भुमी अभिलेख :-** श्री.सोमनाथ कोरके उप अधिक्षक भूमी अभिलेख यांनी तालुका भुमी अभिलेख विभागाचा आढावा पुढील प्रमाणे दिला. भूमी अभिलेख विभागा मार्फत "स्वामित्व" योजना व मोजनी प्रक्रिया सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. गावठाणा व्यतीरीक्त व नगर परिषद हद्दी व्यतीरीक्त बाहेर असणाऱ्या बाहेर असणाऱ्या घरांचे प्रॉपर्टी कार्ड वाटपा बाबत प्रक्रिया सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.

यावर मा.सदस्य श्री.सुकुमार दत्तात्रेय तोंडलेकर यांनी भूमी अभिलेख विभागा मार्फत खाजगी मोजणीचा पर्याय उपलब्ध आहे का? असे विचारले.

यावर श्री.सोमनाथ कोरके उप अधिक्षक भूमी अभिलेख हे "नाही" असे म्हणाले.

यावर मा.सदस्य श्री.सुकुमार दत्तात्रेय तोंडलेकर यांनी अर्ज केल्यास मोजनी किती कालावधीत होते व या संदर्भात क्षेत्राच्या काही अटी आहेत का? असे विचारले.

यावर श्री.सोमनाथ कोरके उप अधिक्षक भूमी अभिलेख यांनी अर्ज केल्या नंतर १ महिन्याच्या आत मोजणी केली जाते असे सांगितले. तसेच वैयक्तिक कारणासाठी मोजणी करावयाची असेल तर २ हेक्टर पर्यंत व औद्योगिक कारणासाठी मोजणी करावयाची असेल तर १ हेक्टर पर्यंत Slab ठरवून देण्यात आलेला आहे असे सांगितले.

**एन.आर.एच.एम. :-** कनिष्ठ लेखाधिकारी एन.आर.एच.एम ता.आ.अ कार्यालय यांनी त्यांचेकडील विषयांचा आढावा सभागृहाला दिला. जननी सुरक्षा योजने अंतर्गत १७ अर्ज प्राप्त झाले असून त्यापैकी १४ लाभार्थ्यांना लाभ मिळाला आहे व उर्वरित लाभार्थ्यांना लाभ मिळण्यासाठी पाठपूरावा सुरू आहे असे त्यांनी सांगितले.

**शिक्षण विभाग :-** श्री.मनोज माळवदे गटशिक्षणाधिकारी प्रतिनिधी यांनी शिक्षण विभागाचा आढावा खाली प्रमाणे दिला. शिक्षण विभागामधील रिक्त पदांचा त्यांनी आढावा दिला. तालुक्यामध्ये ६९ शिक्षकांची पदे रिक्त असल्याचे त्यांनी सांगितले.

यावर मा.सदस्य श्री.सुकुमार दत्तात्रेय तोंडलेकर यांनी तालुक्यामध्ये किती केंद्र प्रमुख आहेत असे विचारले.

यावर श्री.मनोज माळवदे गटशिक्षणाधिकारी प्रतिनिधी यांनी १० पदे मंजूर असून १० रिक्त होती त्यापैकी ६ पदावर केंद्र प्रमुख नियूक्ती करण्यात आली होती मात्र फक्त दोनच केंद्र प्रमुख हजर झाल्यामुळे सध्या ८ पदे रिक्त असल्याचे सांगितले.

यावर मा.सभापती श्री.सचिन नंदाकर किर, यांनी आदगांव येथे १ शिक्षक कमी असल्याचे सांगितले.

यावर श्री.मनोज माळवदे गटशिक्षणाधिकारी प्रतिनिधी यांनी जाहिरात आल्यानंतर शिक्षक उपलब्ध होतील असे सांगितले.

**प्र.पो.श.नि.यो :-** डाटा एन्ट्री ऑपरेटर प्र.पो.श.नि.यो श्री.देविदास फुंदे यांनी प्रधान मंत्री पोषण शक्ती निर्माण योजना आहाराचा आढावा दिला.

त्यानंतर मा.सदस्य श्री.सुकुमार दत्तात्रेय तोंडलेकर यांनी शा.पो.आ चालू आहे का असे विचारले.

यावर श्री.फुंदे यांनी डाटा एन्ट्री ऑपरेटर प्र.पो.श.नि.यो यांनी ११ तारखे पासून अन्न साठा उपलब्ध झाल्याचे सांगितले.

यावर मा.सदस्य श्री.सुकुमार दत्तात्रेय तोंडलेकर यांनी किती दिवस शा.पो.आ उपलब्ध नव्हता असे विचारले.

यावर श्री.फुंदे यांनी डाटा एन्ट्री ऑपरेटर प्र.पो.श.नि.यो यांनी धान्य पुरवठादार नियुक्त नसल्यामुळे १.५ महिने शा.पो.आ उपलब्ध/वितरीत नव्हता असे सांगितले.

यावर मा.सदस्य श्री.सुकुमार दत्तात्रेय तोंडलेकर यांनी १.५ महिने शा.पो.आ उपलब्ध नव्हता तेव्हा तो विद्यार्थ्यांना कशा प्रकारे वितरीत करण्यात आला असे विचारले.

यावर श्री.फुंदे यांनी डाटा एन्ट्री ऑपरेटर प्र.पो.श.नि.यो यांनी या कालावधीत मागील शिल्लक असलेला शा.पो.आ वापरण्याचे निर्देश संबंधित शाळांना देण्यात आले होते असे सांगितले. तसेच जर साठा संपला तर शालेय व्यवस्थापन समितीला शालेय स्तरावर लोकसहभागातून साठा उपलब्ध करण्यास सांगण्यात आले होते.

यावर मा.सदस्य श्री.सुकुमार दत्तात्रेय तोंडलेकर यांनी शा.पो.आ निकृष्ठ दर्जा बाबत कोण जबाबदार आहे असे विचारले.

यावर श्री.फुंदे यांनी डाटा एन्ट्री ऑपरेटर प्र.पो.श.नि.यो यांनी शालेय व्यवस्थापन अध्यक्ष व संबंधीत शाळेचे मुख्याध्यापक हे यासाठी जबाबदार असल्याचे सांगितले.

यावर मा.सदस्य श्री.सुकुमार दत्तात्रेय तोंडलेकर यांनी उपलब्ध शालेय पोषण आहाराची गुणवत्ता तपासणी कोणाकडून केली जाते असे विचारले.

यावर श्री.फुंदे यांनी डाटा एन्ट्री ऑपरेटर प्र.पो.श.नि.यो यांनी केंद्र प्रमुख व मुख्याध्यापक यांच्याकडून शालेय पोषण आहाराची गुणवत्ता तपासणी केली जाते तसेच ॲनालिटीकल टेस्टींग अँड रिसर्च लॅबोरेटरी जळगाव या संस्थेकडून महिन्यातून यादृच्छिक पद्तीने दोन शाळा निवडून तेथील धान्याचे नमुने तपासले जातात असे सांगितले.

यावर मा.सभापती श्री.सचिन नंदाकर किर, यांनी वडवली येथील शा.पो.आ अंतर्गत साठविण्यात आलेले धान्य खराब झाले होते ते धान्य कधी उपलब्ध झाले होते असे विचारले.

यावर श्री.फुंदे यांनी डाटा एन्ट्री ऑपरेटर प्र.पो.श.नि.यो यांनी माहे मार्च - एप्रिल मध्ये सदर धान्य साठा उपलब्ध झाला होता असे सांगितले. ३१ जुलै रोजी त्यांनी बोर्ली येथील शाळेस भेट दिली असता तेथील धान्य जमिनीवरच ठेवल्याचे निदर्शनास आले होते त्या संदर्भात संदर्भित शाळेच्या मुख्याध्यापकांना सुचना देण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

यावर मा.सदस्य श्री.सुकुमार दत्तात्रेय तोंडलेकर यांनी विद्यार्थ्यांना वाटप केला जाणारा आहार हा उत्कृष्ठ दर्जाचा असावा व जर विद्यार्थ्यांना भविष्यात निकृष्ठ दर्जाच्या धान्यामुळे विषबाधा झाली तर संबंधितांवर कडक कारवाई केली जाईल असे सांगितले.

**सर्व शिक्षा अभियान :-** श्री.शेख कनिष्ठ अभियंता हे सभेस उपस्थित न राहिल्याने त्यांचेकडील विषयांचा आढावा सभागृहाला घेता आला नाही.

**ग्राम पंचायत :-** ग्राम पंचायत विभागाचा आढावा श्री. नागे विस्तार अधिकारी यांनी दिला.

ग्रामपंचायत घरपट्टी वसूलीची एकुण मागणी ३,१३,७८,२८४ रूपये एवढी असून त्यापैकी एकुण १३,५८,९७४ एवढी वसूली असुन वसुलीची एकुण टक्केवारी ४.३३% एवढी आहे. ग्रामपंचायत वीजकर वसुलीची एकुण मागणी १२,७४,३५६ असुन त्यापैकी ५४,२२० रूपये एवढी वसुली असुन वसुलीची टक्केवारी ४.३% एवढी आहे. ग्रामपंचायत आरोग्य कराची एकुण मागणी १३,०७,४५५ एवढी असुन त्यापैकी १२,५१,२९५ एवढी शिल्लक असून वसलीची एकुण टक्केवारी ४.३% एवढी आल्याचे सांगितले.

त्यानंतर सभापती मा.श्री.सचिन नंदाकर किर, यांनी शाळा दुरूस्तीचे किती प्रस्ताव पाठविले आहेत याची माहिती द्यावी असे विचारले.

यावर श्री.नागे विस्तार अधिकारी पंचायत यांनी शाळा दुरूस्ती ग्रामपंचायत विभागाच्या अखत्यारीत येत नाही असे सांगितले.

यावर मा.सदस्य श्री.सुकुमार दत्तात्रेय तोंडलेकर, यांनी माणगांव तालुक्यामध्ये तसेच त्यातील साई ग्रामपंचायत मध्ये आठवडे बाजार भरत आहेत त्या धर्तीवर आपल्या श्रीवर्धन तालुक्यातील काही ग्रामपंचायती मध्ये आठवडे बाजार सुरू करण्या बाबत प्रयत्न करावे असे सांगितले.

यावर श्री.नागे विस्तार अधिकारी पंचायत यांनी याबाबत आठवडे बाजारासाठी आवश्यक निकषांची पुर्तता करणेबाबत विविध ग्रामंचायतींशी चर्चा करून जागा उपलब्ध ते बाबत माहिती घेऊन ठरवू असे सांगितले.

त्यानंतर पं.स सदस्या श्रीम.अस्मिता प्रदर्शन चोरगे, यांनी सायेगांव, गालसुरे व साकलोली येथील कामांच्या पुर्णत्वा बद्दल व बिलांबद्दल विचारणा केली.

यावर श्री.नागे विस्तार अधिकारी पंचायत यांनी सायेगांव येथील काम उशिरा पुर्ण झाल्यामुळे अद्याप त्याचे पैसे वर्ग करण्यात आलेले नाहीत गालसुरे येथील कामाचे पैसे देण्यात आले आहेत व साकलोली येथील काम प्रगतीत आहे असे सांगितले.

**<u>पं.स.बांधकाम</u> :-** श्री. स्वप्निल आंधळे यांनी उप विभाग बांधकाम चा संक्षिप्त आढावा दिला.

**<u>पं. स. शेती</u> :-** विस्तार अधिकारी कृषी श्रीम.राधा कऱ्हाळे यांनी पंचायत समिती कृषी विभागाचा संक्षिप्त आढावा दिला. त्यामध्ये त्यांनी पंचायत समिती सेस अंतर्गत कृषी साहित्य बाबत माहिती दिली.

त्यावर मा. पं.स सदस्य श्री.सुकुमार दत्तात्रेय तोंडलेकर यांनी सर्व लाभार्थ्यांची यादी जिल्हा परिषदेकडे मंजुरीसाठी पाठविण्यात यावे असे सांगितले.

यावर विस्तार अधिकारी कृषी श्रीम.राधा कऱ्हाळे हे "होय" असे म्हणाले.

**<u>उप जिल्हा रूग्णालय:-</u>** डॉ.श्री.कौस्तूभ केळसकर वैद्यकिय अधिकारी, उप जिल्हा रूग्णालय यांनी त्यांच्या विभागाचा आढावा दिला.

त्यानंतर सभापती मा.श्री.सचिन नंदाकर किर, यांनी सोनोग्राफी साठी तज्ञ डॉक्टर उपलब्ध झाले आहेत का असा प्रश्न विचारला.

त्यावर डॉ.श्री.कौस्तूभ केळसकर वैद्यकिय अधिकारी, उप जिल्हा रूग्णालय यांनी "नाही" असे उत्तर दिले.

त्यानंतर पं.स सदस्या श्रीम.अस्मिता प्रदर्शन चोरगे, यांनी रूग्णालयात HIV चाचणी केली जाते का? अलीकडील काळात HIV रूग्ण आढळले आहेत का? असे विचारले.

त्यावर डॉ.श्री.कौस्तूभ केळसकर वैद्यकिय अधिकारी, उप जिल्हा रूग्णालय यांनी रूग्णालया मार्फत HIV चाचणी केली जाते मात्र या महिन्यात नवीन रूग्ण आढळले नाहीत असे सांगितले.

**<u>एम.एस.आर.एल.एम</u> :-** तालुका अभियान व्यवस्थापक यांनी त्यांच्या विभागाचा आढावा दिला. तालुका अभियान व्यवस्थापक श्री.स्वप्नील जाधव यांनी MSRLM विभागाचा आढावा सादर केला.

श्रीवर्धन तालुक्यात तसेच राज्यात सध्या मतदारयादीनुयार १००% महिलांना ३१ जुलै पर्यंत बचतगटात समाविष्ठ करण्याची मोहिम सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. मात्र तालुक्यात स्थलांतराची समस्या मोठ्या प्रमाणात असल्यामुळे केवळ होळी पौर्णिमा आणि गणेशोत्सवासाठी गावाला हजर राहणाऱ्या महिलांना स्थलांतरीत समजावे अशा सुचना देण्यात आल्यामुळे २९,४०० महिलांपैकी केवळ ५,००० महिलांना बचतगटामध्ये समाविष्ठ करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. तसेच ज्या ठिकाणी २०० खाटांपेक्षा कमी क्षमतेचे रूग्णालय आहे त्या ठिकाणी महिला बचत गटांना उपहार गृह सुरू करण्यास अनुमती देण्यात येणार असल्यामुळे त्या संदर्भात अर्ज प्रक्रिया सुरू असल्याचे सांगितले.

**<u>टंचाई पाणी पुरवठा</u> :-** श्री.अंकुश सुर्यवंशी कनिष्ठ सहाय्यक लिपिक यांनी श्रीवर्धन तालुक्यातील पाणी टंचाईचा अहवाल दिला.

**<u>घरकुल</u>:-** श्री. आकांत सलामे यांनी घरकुल विभागाचा आढावा दिला.

**<u>विषय क्र. ७</u> :- पुढील सभेची तारीख व वेळ ठरविणे.**

पंचायत समिती श्रीवर्धनची पुढील मासिक सर्वसाधारण सभा बुधवार, दिनांक ०९/०९/२०२६ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता पंचायत समिती श्रीवर्धनच्या महाराष्ट्र भूषण आदरणीय ती.डॉ.श्री.नानासाहेब धर्माधिकारी सभागृह येथे घेण्याचे सर्वानुमते ठरले.

**<u>विषय क्रमांक. ८</u> :- मा.सभापती सो. यांच्या परवानगीने आयत्या वेळेच्या विषयावर चर्चा करणे.**

कोणत्याही विभागाचे आयत्या वेळेचे विषय नव्हते.

सभेचा समारोप करतांना मा.गट विकास अधिकारी पंचायत समिती, श्रीवर्धन यांनी, सदर सभेत सन्माननीय सदस्य यांनी मांडलेल्या मुद्याबाबत पुर्तता करावी तसेच आगामी सभेपुर्वी सदर सभेतील चर्चेप्रमाणे माननीय सदस्य यांना माहिती देण्यात यावी तसेच सभेस उपस्थित मा. सभापती श्री. सचिन नंदाकर किर, मा. उप सभापती श्रीम.पुजा प्रशांत शिंदे, मा. पं.स.सदस्य श्री. सुकुमार दत्तात्रेय तोंडलेकर. मा.पं.स.सदस्या श्रीम. अस्मिता प्रदर्शन चोरगे, यांचे तसेच सभेस उपस्थित खातेप्रमुख, अधिकारी व कर्मचारी यांचे आभार मानले. सभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पाडल्याबद्दल सर्वांचे आभार मानुन मा. सभापती साो., यांचे वतीने सभा संपल्याचे जाहीर केले.

**सचिव तथा गटविकास अधिकारी (वर्ग-१)**
**पंचायत समिती, श्रीवर्धन**

**(श्री.सचिन नंदाकर किर)**
**सभापती**
**पंचायत समिती, श्रीवर्धन**

## पंचायत समिती मासिक सर्वसाधारण सभा (इतिवृत्त भाग -२)

| सभेची तारीख व वेळ | प्रस्तावाचा विषय | प्रस्तावाचा मजकूर | सूचक अनुमोदक | दुरुस्ती असल्यास | | दिलेल्या मतांची संख्या | | दुरुस्ती नंतर मतदाना नंतर अंतिम निर्णय | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | सूचक | अनुमोदक | बाजूने | विरुध्द | मजकूर | ठराव क्र. |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| **दिनांक: १४/०८/२०२६ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता** | **दु:खवटा ठराव** | **दु:खवटा ठराव**<br><br>दु:खवटा ठराव नव्हते | | | | | | | |
| | **अभिनंदन ठराव** | **अभिनंदन ठराव**<br>**१) ठराव क्रमांक :-२६**<br>जनता प्रसारक शिक्षण मंडळ बोर्लीपंचतनच्या संचालक मंडळावर पंचायत समितीचे माजी सभापती व विद्यमान पंचायत समिती सदस्य श्री.सुकुमार दत्तात्रेय तोंडलेकर यांची निवड झालेबद्दल ही पंचायत समिती सर्वानुमते अभिनंदन ठराव पारित करत आहे.<br><br>सूचक:- मा.श्री.सचिन नंदाकर किर, सभापती<br>अनुमोदक:- मा.श्रीम.पुजा प्रशांत शिंदे, उपसभापती<br>ठराव सर्वानुमते मंजूर-**२६**<br><br>**२) ठराव क्रमांक :-२७**<br>पंचायत समितीचे माजी सभापती व विद्यमान पंचायत समिती सदस्य श्री.सुकुमार दत्तात्रेय तोंडलेकर यांची श्री. मोहनलाल सोनी विद्यालय बोर्लीपंचतन या शैक्षणिक समितीच्या संचालक पदी निवड झाले बद्दल ही पंचायत समिती सर्वानुमते अभिनंदन ठराव पारित करत आहे.<br><br>सूचक:- मा.श्री.सचिन नंदाकर किर, सभापती<br>अनुमोदक:- मा.श्रीम.अस्मिता प्रदर्शन चोरगे, पं.स सदस्या<br>ठराव सर्वानुमते मंजूर-**२७** | | | | | | | |

# पंचायत समिती मासिक सर्वसाधारण सभा (इतिवृत्त भाग -२)

| | | |
|---|---|---|
| | | **३) ठराव क्रमांक :-२८**<br>मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत ग्रामपंचायत रानवलीने जिल्हास्तरावर प्रथम क्रमांक संपादन करुन पुरस्कार मिळवल्याबद्दल पंचायत समिती श्रीवर्धन मार्फत रानवली ग्रामपंचायतीचे सरपंच, ग्रामसेवक आणि समस्थ ग्रामस्थांचे अभिनंदन करणारा ठराव ही पंचायत समिती अभिनंदन ठराव पारित करत आहे.<br><br>सूचक:- मा.श्री.सुकुमार दत्तात्रेय तोंडलेकर, पं.स सदस्य<br>अनुमोदक:- मा.श्री.सचिन नंदाकर किर, सभापती<br>ठराव सर्वानुमते मंजूर-**२८** |
| | **विषय क्रमांक:-१**<br>मागिल महाच्या मासिक सभेचे इतिवृत्त वाचून मंजूर करणे | **पुर्तता**<br>पंचायत समितीच्या मागिल सभेच्या इतिवृत्तावर केलेल्या कार्यवाहीचा आढावा भाग एक मध्ये नमुद केल्याप्रमाणे घेणेत आला. तसेच दिनांक १५/०७/२०२६ रोजी सभेचे ईतीवृत्त मंजुर करणेत आले. |
| | **विषय क्रमांक:-२**<br>मागिल महाच्या मासिक सभेतील ठराव पुर्तता आढावा घेणे. | **पुर्तता**<br>मागिल महाच्या मासिक सर्वसाधारण सभेचे ठराव पुर्तता करणेत आली आहे. |
| | **विषय क्रमांक:-३**<br>मा.सदस्यांनी विचारलेल्या लेखी प्रश्नांना उत्तरे देणे. | **पुर्तता**<br>इतिवृत्त भाग-१ मध्ये नमूद केल्याप्रमाणे. |
| | **विषय क्रमांक:- ४**<br>सन्मा.सदस्यांच्या रजेच्या अर्जास मंजूर देणे. | **पुर्तता**<br>इतिवृत्त भाग-१ मध्ये नमूद केल्याप्रमाणे सन्मा. पंचायत समिती सदस्यांचे रजेचे अर्ज नाहीत. |

# पंचायत समिती मासिक सर्वसाधारण सभा (इतिवृत्त भाग -२)

| | | |
|---|---|---|
| | **विषय क्रमांक:- ५**<br>महत्वाच्या पत्रव्यवहाराचे वाचन करणे. | **पुर्तता**<br>इतिवृत्त भाग-१ मध्ये नमूद केल्याप्रमाणे महत्वाचे पत्रव्यवहार वाचनासाठी नव्हते. |
| | **विषय क्रमांक:- ६**<br>विकास कामांचा आढावा घेणे. | **पुर्तता**<br>खाते प्रमुख, पशुधन विकास अधिकारी, तालुका आरोग्य अधिकारी, उप अभियंता (बांधकाम), बाल विकास प्रकल्प अधिकारी, उप अभियंता (ग्रा.पा.पु),ग.शि.अधिकारी, तालुका कृषी अधिकारी, विस्तार अधिकारी (सर्व), शाखा अभियंता (बांध.) (प्रभारी), कनिष्ठ अभियंता इ. मागील महात केलेल्या कामांचा आढावा सभागृहाला दिला. |
| | | |
| | **विषय क्रमांक :- ७**<br>पुढील सभेची तारीख व वेळ ठरविणे. | **पुर्तता**<br>पंचायत समिती श्रीवर्धनची मासिक सर्वसाधारण सभा बुधवार दिनांक ०९/०९/२०२६ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता महाराष्ट्र भूषण आदरणीय तीर्थ.डॉ.श्री.नानासाहेब धर्माधिकारी सभागृह पंचायत समिती श्रीवर्धन येथे घेण्याचे सर्वानुमते ठरले. |
| | **विषय क्रमांक:-८**<br>मा.सभापती सो.,यांच्या परवानगीने आयत्या वेळेच्या विषयावर चर्चा करणे. | **पुर्तता**<br>मा.सभापती सो., यांच्या परवानगीने चर्चेला येणारे आयत्या वेळेचे विषय नव्हते. |

**सचिव तथा गटविकास अधिकारी (वर्ग-१)**
**पंचायत समिती, श्रीवर्धन**

**(श्री.सचिन नंदाकर किर)**
**सभापती**
**पंचायत समिती, श्रीवर्धन**